# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/11/2023 (शनिवार) दुपार

---

## विनयभंग

**पो.स्टे. बोरी**:— दिनांक ०९/११/२०२३ चे १३.३० वा. ते १३.४० वा. दरम्यान फिर्यादी हिचा मुलगा वय ९ वर्ष याने फिर्यादीला येवुन सांगीतले की तु आंघोळ करतांना ०२ विधीसंघर्ष ग्रस्त बालक यांनी लपत छपत मोबाईल वरून व्हिडीओ काढले असे सांगीतले असता फिर्यादी हिने मोबाईल चेक केला असता त्यामध्ये फिर्यादी हि आंघोळ करतांना अश्लिील चित्रीकरन केलेला व्हिडीओ होता.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे विधीसंघर्ष बालक यांचे विरूद्ध कलम ३५४(सी), ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रेजीवाड मो. नं. ९८३४८२५७९३ या करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. अरोली**:— दिनांक १०/०३/२०२३ चे १२.०० वा. ते दि. १०/११/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे— बाबुलाल राजाराम मोहनकर, वय ४८ वर्ष, रा. धनीता. मौदा जि. नागपूर** हा फिर्यादीचे घरी कोणी नसल्याचा फायदा घेवुन घरी आला व आतील दार लावुन त्याने फिर्यादीचा हात पकडून खाटेवर जबरी संभोग केला. फिर्यादीने तिच्या आई—भावाजवळ तुझा नाव सांगणार असे म्हटले असता, त्याने फिर्यादीला ‘‘तु माझे नाव सांगसील तर मी तुला व तुझे आई—भावाला जिवाने मारणार अशी धमकी दिली. त्यानंतर आरोपीने फिर्यादी सोबत वारंवार शारीरीक संबंध केले. दि. १०/११/२०२३ रोजी सकाळी ०९/०० वा. दरम्यान गावातील अंकोश लिंगे याने फिर्यादीचे घरी येवुन फिर्यादीचे आईला सांगितले की, बाबुलाल राजाराम मोहनकर याने तुमच्या मुलीसोबत अश्लिल कृत्य करतानांचे व्हिडीओ त्यांच्या मोबाईल व्हॉस्ट अप स्टेटसवर ठेवलेला होता व ते व्हिडीओ त्याने फिर्यादीचे आईला दाखविले. फिर्यादीचे आईने फिर्यादीला याबाबत विचारणा केली असता फिर्यादीने घडलेली सर्व हकीकत सांगितली व त्याने फिर्यादी सोबत अश्लिल लैगिंग कृत्य करतानाचे व्हीडीओ कधी काढले याबाबत फिर्यादीला काहीही माहीती नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (१) ३७६(२) (द) ३७६ (३) ५०६ भादवी सहकलम ४, ६, पोक्सो सह. ६७, ६७ (अ) ६७ (ब) माहीती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. राहुल सोनवाणे ठाणेदार पो. स्टे. पारशिवनी मो. क्र. ७०२०५७७४५९ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. कोंढाळी**:— अंतर्गत ०५ किमी अंतरावर मौजा बिहालगोंदी शिवार येथे दिनांक ०९/११/२०२३ चे २०.०० वा. ते १०/११/२०२३ चे ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शेख सुभान शेख ईस्माईल, वय ५६ वर्ष, रा. राम नगर कोंढाळी हा दिनांक ०९/११/२०२३ चे रात्री २०.०० वा. सुमारास गोठयाला ज्यात १२ क्विंटल कापुस व एक फवारा करण्याची मशिन ठेवली होती त्याला कुलुप लावुन घरी आला होता व दिनांक १०/११/२०२३ रोजी सकाळी ०७.३० वा. दरम्यान नेहमीप्रमाणे फिर्यादी बिहालगोंदी शिवारातील शेतात गेला असता शेतातील गोठयाचा दरवाजा कुलुपासोबत तुटलेला दिसला व गोठयात ठेवलेला १२ क्विंटल कापुस किंमती ६०,०००/— रू व एक फवारणी करण्याची मशिन किंमती ४०००/—रू.ची दिसली नाही. तरी दि. ०९/११/२०२३ चे २०/०० वा. ते दि. १०/११/२३ चे ०७.३० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे शेतातील गोठयातुन १२ क्विंटल कापुस किंमती ६०,०००/— रू व एक फवारणी करण्याची मशिन किंमती ४०००/— रू. असा एकुण ६४,०००/— रू चा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार नरेश गाते मो. नं. ९८८१३५७७४८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**